# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.11.2025** **वारःरविवार**

---

कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूरमध्ये उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते विठ्ठलाची शासकीय महापूजा

राज्यातील बळीराजाला सुखी कर – उपमुख्यमंत्र्याचं विठ्ठलाला साकडं

मतदार याद्यांमध्ये गैरप्रकार झाल्याचा आरोप करत महाविकास आघाडीचा मुंबईत मोर्चा

आशियाई मुष्टीयुद्ध स्पर्धेत पुण्याच्या चंद्रिका पुजारीला सुवर्णपदक, आणि

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत आज भारत आणि दक्षिण आफ्रिका संघात लढत

**<u>विठ्ठलसाकडं</u>**

राज्यातील शेतकऱ्यांवरचं संकट दूर होऊ दे; बळीराजाला सुखी कर असं साकडं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विठ्ठलाला घातलं. कार्तिक एकादशीच्या निमित्ताने आज पहाटे पंढरपुरात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सपत्नीक विठ्ठलाची शासकीय महापूजा केली. त्यानंतर ते बोलत होते. यावेळी मानाचे वारकरी म्हणून नांदेड जिल्ह्यातील रामराव आणि सुशिलाबाई वालेगावकर या दांपत्याला विठ्ठलाची महापूजा करण्याचा मान मिळाला. विशेष म्हणजे यंदा जिल्हा परिषदेच्या शाळेतील 2 विद्यार्थ्यांनाही पूजा करण्याचा मान देण्यात आला. कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने आज पंढरपूरात पहाटेपासून लाखो भाविकांनी चंद्रभागा नदीत पवित्र स्नान केलं. महाराष्ट्रासह, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि इतर राज्यांतून सुमारे आठ लाख भाविक पंढरपूरात दखल झाले असून 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला आहे.

**<u>मोर्चा</u>**

मतचोरी आणि मतदार याद्यांमध्ये गैरप्रकार झाल्याचा आरोप करत महाविकास आघाडीनं काल मुंबईत सत्याचा मोर्चा काढला. या मोर्चात ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, मनसेचे प्रमुख राज ठाकरे, सुप्रिया सुळे, सतेज पाटील, विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे सहभागी झाले

होते. डाव्या पक्षांचे नेते आणि कार्यकर्तेही मोठ्या संख्येनं त्यामध्ये सहभागी झाले होते. सदोष मतदार याद्यांची दुरुस्ती झाल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेतल्या जाऊ नयेत, अशी महाविकास आघाडीची मागणी आहे.

दरम्यान, भाजपानं याला प्रत्युत्तर म्हणून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मूक मोर्चा काढला होता. राज्यातील जनतेची दिशाभूल करणारा हा विरोधकांचा मोर्चा, सत्याचा नव्हे तर सत्तेचा आहे, अशी टीका भाजपानं केली आहे.

**<u>खरेदी</u>**

केंद्र सरकारच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मूग, उडीद आणि सोयाबीन पिकांच्या खरेदीला येत्या १५ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना ॲपद्वारे किंवा खरेदी केंद्रांवर ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. या नोंदणीला ३० ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे तर अंतिम मुदत ३१ डिसेंबर आहे. खरेदीचा कालावधी १५ नोव्हेंबरपासून पुढील ९० दिवसांसाठी असेल.

**<u>खुला बाजारविक्री</u>**

भारतीय अन्न महामंडळाच्या महाराष्ट्रातल्या प्रादेशिक कार्यालयानं ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून खुला बाजार विक्री योजनेअंतर्गत तांदळाची विक्री सुरू केली आहे. खरेदीदारांनी अन्न महामंडळाच्या ई-लिलावात बोली लावावी, असं आवाहन महामंडळाने केलं आहे. येत्या ६ आणि ७ नोव्हेंबर रोजी तांदळाचा ई-लिलाव होणार असून यासाठी १० हजार मेट्रिक टन तांदूळ उपलब्ध केला जाईल, असं यात म्हटलं आहे.

**<u>संगीतसंमेलन</u>**

६७व्या आकाशवाणी संगीत संमेलनाचं आज मुंबईत उद्घाटन होणार आहे. आकाशवाणी मुंबईच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित अरुण कशाळकर उपस्थित राहणार आहेत.

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायक पद्मश्री पंडित वेंकटेश कुमार आणि प्रसिद्ध भारूड कलाकार हामिद अमीन सय्यद आणि त्यांचं पथक आपली कला सादर करणार आहेत. येत्या २९ नोव्हेंबरपर्यंत देशभरातल्या २४ आकाशवाणी केंद्रांवर

हिंदुस्तानी, कर्नाटक शैलीतलं शास्त्रीय संगीत तसंच सुगम आणि लोकसंगीत अशा विविध परंपरांमधले कलाकार आपली कला सादर करणार आहेत.

**<u>सौरऊर्जा</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेनं सौर ऊर्जेच्या माध्यमातून स्वमालकीच्या विविध इमारतींवर सौर यंत्रणा कार्यान्वित केल्या आहेत. यामुळे महापालिकेच्या वीजबिलात ५ कोटी ९१ लाख रुपयांची बचत झाली आहे. आगामी काळात या योजनेची व्याप्ती वाढवणार असल्याची माहिती महापालिकेचे सहशहर अभियंता अनिल बालसाखळे यांनी आकाशवाणीशी बोलताना दिली..

**<u>तपासपथक</u>**

फलटणच्या महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी विशेष तपास पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. राज्य राखीव पोलीस दलाच्या समादेशक तेजस्वी सातपुते यांची नेमणूक विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज गुप्ता यांनी केली. तेजस्वी सातपुते यांनी काल फलटण इथं जाऊन या प्रकरणाची माहिती घेतली.

**<u>पक्षिमित्र</u>**

अमरावती इथं काल सुरू झालेल्या तिसऱ्या अखिल भारतीय आणि ३८व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचं उद्घाटन राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक एम. श्रीनिवास रेड्डी यांच्या हस्ते झालं. मित्रा राज्य नियोजन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी संमेलनाध्यक्ष आहेत.

“नैसर्गिक अधिवास नष्ट होत असल्यानं पक्षांच्या विविधतेला धोका निर्माण झाला असून अधिवास संवर्धनाची गरज आहे”, असं मत परदेशी यांनी व्यक्त केलं. ते आभासी पद्धतीने संमेलनाध्यक्ष म्हणून बोलत होते.

**<u>पंचवटी</u>**

नाशिककरांची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या पंचवटी एक्सप्रेसचा ५०वा वाढदिवस मनमाड आणि नाशिकरोड रेल्वे स्थानकात काल  मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पंचवटी एक्सप्रेसचे नाशिकरोड रेल्वे स्थानकावर सकाळी सात वाजता आगमन झाल्यानंतर केक कापून आणि पेढे वाटून हा आनंद साजरा करण्यात आला.

**पुलोत्सव**

यंदाचा ग्लोबल पुलोत्सव येत्या 6 ते 8 नोव्हेंबर या कालावधीत पुण्यात आयोजित करण्यात आला आहे. यंदाचं हे वर्ष पुलंच्या 25 व्या स्मृतिदिनाचं आणि सुनीता देशपांडे यांच्या जन्मशताब्दीचं  असल्यामुळे  त्यामध्ये सन्मान सोहळा, पुलंविषयीचे सांस्कृतिक कार्यक्रम, परिसंवाद, चर्चासत्र, पुलंवरील लघुपट तसेच पुलंच्या साहित्यावर आधारित महाराष्ट्रातील व्यंगचित्रकारांनी रेखाटलेली अर्कचित्र असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. महोत्सवाचे स्वागताध्यक्ष, कृष्णकुमार गोयल अजित गाडगीळ, संयोजक वीरेंद्र चित्राव आणि सतीश जकातदार यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**चंद्रिका**

बहारीनमध्ये सुरु असलेल्या आशियाई युवा क्रीडास्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत ४८ पदकांची कमाई केली आहे. यामध्ये मुष्टीयुद्ध स्पर्धेत पुण्याच्या चंद्रिका पुजारीने 54 किलो वजनी गटात सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपली कारकीर्द घडवत असलेल्या चंद्रिकाबद्दल बोलताना पुण्याचे प्रशिक्षक मनोज पिंगळे म्हणाले..

मनोजपिंगळेबाईट– ४२ सेकंद

**क्रिकेट**

आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत आज भारत आणि दक्षिण आफ्रिका सामोरासमोर येणार आहेत. नवी मुंबईतल्या डी वाय पाटील मैदानावर दुपारी ३ वाजता सामन्याला सुरुवात होईल. या सामन्यानंतर महिला क्रिकेट विश्वाला नवा विश्वविजेता मिळणार आहे. भारताला साखळी सामन्यात सलग तीन पराभवांचा सामना करावा लागला होता. पण नंतर न्यूझीलंडला पराभूत करत यजमान संघाने स्पर्धेत जोरदार पुनरागमन केलं. आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध संस्मरणीय धावांचा पाठलाग करत अंतिम फेरीही गाठली. दुसरीकडे दक्षिण आफ्रिकेने पाच विजयांसह उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. दरम्यान पुरुष संघाचा आज होबार्ट इथं ऑस्ट्रेलियाविरुद्ध वीस षटकांचा तिसरा सामना होणार आहे. पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना पावसामुळे वाया गेला होता तर दुसरा सामना ऑस्ट्रेलियाने जिंकून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

**हवामान**

रत्नागिरी आणि सांगली जिल्ह्यात काल जोरदार पाऊस पडला. पुण्यातही काल पावसाच्या सरी बरसल्या. येत्या २४ तासात कोकणात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं  प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**